# श्री हरेश्वर

## सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई

नोंदणी क्र.: बी.ओ.एम./डब्ल्यु.(बी)/आर.एस.आर./(सी.आर.)/३५१ सन १९९४-९५




# २९ वा

## वार्षिक अहवाल

सन २०२२-२०२३

भारताची
चंद्र भरारी..

## भारताची चंद्र भरारी...

गौरवशाली भारताचे.....

नवे पाऊल प्रगतीचे......

प्रशासकीय कार्यालय

बी/२०२, प्रणव कमर्शिअल प्लाझा, एम.जी.रोड, मुलुंड(प.), मुंबई ४०००८०. ✆ मो.: ८६५७९७१८८१

E-mail : ho@shreehareshwar.com • Website : www.shreehareshwar.com

**श्री हरेश्वर**
**सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई**

**२९ वा वार्षिक अहवाल**
**सन २०२२-२३**

# विद्यमान संचालक मंडळ

सन २०२३ ते सन २०२८



**श्री. शंकर पां. शिंदे**
अध्यक्ष



**श्री. सुदाम स. जाधव**
उपाध्यक्ष



**श्री. बाबाजी स. आंधळे**
सचिव



**श्री. बबन शं. शिर्के**
खजिनदार



**श्री. विठ्ठल य. रोकडे**
संचालक



**श्री. अशोक बा. दाते**
संचालक



**श्री. मच्छिंद्र धों. वाफारे**
संचालक



**श्री. तुकाराम सो. शिर्के**
संचालक



**श्री. संतोष वि. शिंदे**
संचालक



**श्री. दत्तात्रय वि. आंधळे**
संचालक
(दि.२७/०५/२०२३ पर्यंत)



**श्री. साहेबराव ब. उंडे**
संचालक
(दि.२७/०५/२०२३ पर्यंत)



**श्री. अशोक शं. आंधळे**
संचालक
(दि.२७/०५/२०२३ पर्यंत)



**सौ. सुनंदा ग. वाफारे**
संचालिका



**सौ. विद्या स. आंधळे**
संचालिका

# संचालक मंडळ



**श्री. लक्ष्मण कों. दाते**
संचालक
(दि. २७/०३/२०२३ पर्यंत)



**श्री. मुरलीधर ग. पावडे**
संचालक
(दि. २७/०३/२०२३ पर्यंत)



**श्री. प्रदिप ह. शिर्के**
संचालक
(दि. २७/०३/२०२३ पर्यंत)



**श्री. रामदास वि. शिंदे**
संचालक
(दि. २७/०३/२०२३ पर्यंत)



**श्री. बाबाजी भ. वाफारे**
संचालक
(दि. २७/०३/२०२३ पर्यंत)



**श्री. कृष्णा ल. वाफारे**
संचालक
(दि. २७/०३/२०२३ पर्यंत)



**श्री. महादू शं. उंडे**
संचालक
(दि. २७/०३/२०२३ पर्यंत)



**सौ. रंजना ब. उंडे**
संचालिका
(दि. २७/०३/२०२३ पर्यंत)



**श्री. नामदेव भा. पोटे**
सरव्यवस्थापक



**श्री. सोपान रं. जाधव**
सहव्यवस्थापक

## आमचे स्फुर्तिस्थान

### संस्थापक



# समाजभुषण कै. विष्णुशेठ पाटीलबा शिंदे

(आप्पा)

यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन !

**नोंदणी क्र.** : बी.ओ.एम्./डब्ल्यु. (बी.) आर. एस.आर. (सी.आर)/३५१ सन १९९४-९५
**प्रशासकीय कार्यालय** : बी/२०२, प्रणव कमर्शिअल प्लाझा, महात्मा गांधी रोड, मुलुंड (प.), मुंबई - ४०० ०८०.
दूरध्वनी : ८६५७९७१८८१

# २९ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

स.न.वि.वि...

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची **२९वी** अधिमंडळाची वार्षिक सभा **शनिवार, दि.२६/०८/२०२३ रोजी दुपारी ठिक ३.०० वाजता श्री नारायण मंदिर समिती सभागृह, गुरुदेवगिरी कॉम्प्लेक्स, बालाजी मंदिराजवळ, सेक्टर २०, नेरुळ, नवी मुंबई - ४०० ७०६.** या ठिकाणी संस्थेचे अध्यक्ष **श्री. शंकर पांडुरंग शिंदे** यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे तरी सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे, हि विनंती.

## * सभेपुढील विषय *

१) दि. १७ सप्टेंबर २०२२ रोजी झालेल्या २८ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत वाचून कायम करणे.
२) दि. ३१ मार्च २०२३ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रकास मंजुरी देणे.
३) संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२२-२३ सालच्या नफा विभागणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे
४) सन २०२२-२३ या वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
५) सन २०२३-२४ सालाकरिता वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
६) सन २०२३-२४ सालाकरिता अंतर्गत लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
७) सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकातील कमी जास्त झालेल्या खर्चास मंजूरी देणे व संस्थेच्या २०२३-२४ सालच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
८) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.
९) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१०) सन २०२१-२२ च्या वैधानिक लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
११) मा. अध्यक्षांचे परवानगीने नियमांस अनुसरुन ऐनवेळी येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या अनुज्ञेने
**श्री. बाबाजी सबाजी आंधळे**
सचिव

स्थळ : मुंबई
दिनांक : ११/०८/२०२३

## * विशेष सुचना *

१. गणसंख्येअभावी सभा तहकुब झाल्यास ही सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेतली जाईल व सदर सभेस गणसंख्या पूर्तीचे बंधन राहणार नाही.
२. संस्थेचा सन २०२२-२३ चा वार्षिक अहवाल संस्थेच्या सर्व शाखांमध्ये व संस्थेच्या www.shreehareshawar.com या वेबसाईट वर उपलब्ध करण्यात आलेला आहे. तथापि आवश्यकता असल्यास ही नोटीस दाखवून अहवालाची प्रत संस्थेच्या नजिकच्या शाखेमधून घ्यावी. सभेस येताना अहवालाची प्रत सोबत आणावी.
३. ज्या सभासदांना जमा खर्च व ताळेबंदाविषयी प्रश्न विचारावयाचे असतील, त्यांनी आपले प्रश्न सर्वसाधारण सभेच्या सात दिवस अगोदर लेखी स्वरुपात संस्थेच्या प्रशासकीय कार्यालयात दयावेत.

# २९ वा वार्षिक अहवाल सन २०२२-२३

**सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,**

आपल्या पतसंस्थेचा सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचा म्हणजेच **२९ वा वार्षिक अहवाल** व त्यासोबत लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेले दि. ३१ मार्च २०२३ चे ताळेबंद व नफा-तोटा पत्रक संचालक मंडळाच्या वतीने आपणासमोर सादर करताना आम्हांस विशेष आनंद होत आहे. संस्थेची अहवाल सालातील आर्थिक स्थिती व प्रगतीची वाटचाल खालील बाबींवरून आपणांस दिसून येते.

## संस्थेचा अहवाल सालातील प्रगतीचा आढावा

| अ. नं. | तपशिल | दि. ३१/०३/२०२२ अखेर रुपये | दि. ३१/०३/२०२३ अखेर रुपये | निव्वळ वाढ रुपये | % |
|---|---|---|---|---|---|
| १ | भाग भांडवल | १,९९,४८,८००.०० | २,१७,९९,०००.०० | १८,५०,०००.०० | ९.२७% |
| २ | राखीव व इतर निधी | ४,०१,५६,७४०.२६ | ४,३३,७८,७६४.२६ | ३२,२२,०२४.०० | ८.०२% |
| ३ | सभासद ठेवी | ३७,३३,७१,१६७.१८ | ४३,६०,८८,१७७.७८ | ६,२७,१७,०१०.६० | १६.८०% |
| ४ | गुंतवणूक | ११,९५,४९,२५३.०० | १४,५०,३८,१५८.०० | २,५४,८८,९०५.०० | २१.३२% |
| ५ | सभासद कर्ज | ३१,५५,४१,२०५.५९ | ३८,३५,४५,७०३.६७ | ६,८०,०४,४९८.४८ | २१.५५% |
| ६ | खेळते भांडवल | ४६,९१,६५,२७९.४३ | ५६,३२,९९,९३८.४६ | ९,४१,३४,०८९.०३ | २०.०६% |
| ७ | निव्वळ नफा | ४१,१०,९२३.४० | ४५,०४,२४८,.७७ | ३,९३,३२५.३७ | ९.५७% |
| ८ | संमिश्र व्यवसाय | ६८,८९,१२,३७२.७७ | ८१,९६,३३,८८१.४५ | १३,२७,२१,५०८.६८ | १९.२७% |

### सभासद :

संस्थेची **३१ मार्च २०२२** अखेर एकूण सभासद संख्या **३९००** इतकी होती. अहवाल सालात **२७८** नवीन सभासद झाले असून अहवाल साली **४१**सभासदांनी सभासदत्वाचे राजीनामे दिल्यामुळे **३१ मार्च २०२३** अखेर सभासद संख्या **४१३७** इतकी झाली आहे.

### वसूल भागभांडवल :

संस्थेचे अधिकृत भागभांडवल **₹ ५,००,००,०००/-(रुपये पाच कोटी)** इतके आहे. वर्षारंभी वसुल भाग भांडवल **₹१,९९,४८,८००/-** एवढे होते. त्यामध्ये अहवाल सालात **₹ २६,२२,१००/-** ने वाढ झाली आहे. तथापि संस्थेच्या **४१** सभासदांनी सभासदत्वाचे राजीनामे दिल्याने **₹ ७,७१,९००/-** इतकी भाग रक्कम त्यांना परत करण्यात आली, त्यामुळे **दि. ३१ मार्च २०२३** अखेर संस्थेचे भागभांडवल **₹ २,१७,९९,०००/-** झाले आहे. गतवर्षीच्या तुलनेत **९.२७%** ने भागभांडवलामध्ये वाढ झाली आहे.

## राखीव व इतर निधी :

संस्थेची जनमाणसांत असलेली विश्वासार्हता ही संस्थेच्या स्वनिधीवर अवलंबून असते, निधी जेवढा जास्त तितका संस्थेचा पाया मजबूत असतो. त्यानुसार संस्थेने विविध निधी उभारले आहेत. अहवालसाली संस्थेच्या एकूण निर्धीमध्ये **₹ ३२,२२,०२४/-** इतक्या रक्कमेची वाढ होऊन **दि. ३१ मार्च २०२३** अखेर संस्थेचा एकुण राखीव व इतर निधी **₹ ४,३३,७८,७६४.२६** इतका शिल्लक आहे.

## ठेवी :

ठेवींवरील व्याजदराबाबत असलेल्या तीव्र स्वरुपातील स्पर्धेमुळे ठेवी संकलनावर मर्यादा असताना संस्थेने अहवाल सालात ठेवी वाढविण्यासाठी समाधानकारक प्रयत्न केल्याचे जाणवते. संस्थेच्या ठेवींमध्ये सातत्याने वाढ होत असून अहवालसालात **₹ ६,२७,१७,०१०.६०** इतक्या रक्कमेची ठेवींमध्ये निव्वळ वाढ झाली आहे **दि. ३१ मार्च २०२३** अखेर संस्थेच्या एकूण ठेवी **₹ ४३,६०,८८,१७७.७८** इतक्या झाल्या आहेत. सभासद ठेवींमध्ये गतवर्षाच्या तुलनेत अहवाल साली **१६.८० %** इतकी वाढ झाली आहे.

## कर्ज वाटप :

संस्थेने समाजातील सर्व स्तरातील जनतेकडून स्विकारलेल्या ठेवींची सुरक्षितता व लाभप्रदता कधीही कमी होणार नाही, याची परिपूर्ण काळजी घेऊन उत्पादकता, आवश्यकता,कर्ज परतफेड क्षमता व सुरक्षितता हे निकष लावून संस्थेने कर्ज वाटपाचे सुसंगत अशा धोरणाचा अवलंब करुन त्यानुसार कर्जवाटप करताना सर्व सामान्य सभासदांना आम्ही नेहमी अग्रक्रम दिलेला आहे. **दिनांक ३१ मार्च २०२२** अखेर संस्थेचे **₹ ३१,५५,४१,२०५.५९** कर्ज येणे बाकी होते. अहवाल सालामध्ये संस्थेने सभासदांना **₹ १७,६०,४५,१९६.००** रक्कमेचे नव्याने कर्ज वाटप केले असून **₹ १०,८०,४०,६९७.९२** इतकी कर्ज वसूली होऊन **दि. ३१ मार्च २०२३** अखेर एकुण **₹ ३८,३५,४५,७०३.६७** इतके कर्ज येणे बाकी आहे. गतवर्षीच्या तुलनेत कर्ज वाढीचे शेकडा प्रमाण **२१.५५%** एवढे आहे.

## कर्ज वसुली :

संचालक मंडळाचे सहकार्याने व मार्गदर्शनाखाली संस्थेच्या सेवक वर्गाने अथक प्रयत्न करुन थकीत कर्जाची समाधानकारक वसूली केली आहे. **दि. ३१ मार्च २०२३ अखेर कर्ज थकित प्रमाण ४.४०% इतके आहे.** तसेच **एन.पी.ए.निकषानुसार एन.पी.ए. रक्कमेची, येणे व्याज रक्कमेची व उत्तम जिंदगी (standerd Asset) कर्ज** रक्कमेची **१००%** तरतूद करण्यात आली आहे. दिनांक ३१ मार्च २०२३ अखेर संस्थेचे **निव्वळ एनपीए / NET NPA** प्रमाण **९.२२%** इतके आहे.

## गुंतवणूक :

**दिनांक ३१मार्च २०२२** अखेर संस्थेची इतर बँकांमध्ये एकूण **₹११,९५,४९,२५३/-** रक्कमेची गुंतवणुक होती. अहवाल सालामध्ये **₹ २,५४,८८,९०५/-** इतकी वाढ होऊन **दिनांक ३१ मार्च २०२३** अखेर **₹१४,५०,३८,१५८/-** इतक्या रक्कमेच्या ठेवी इतर बँकांमध्ये सुरक्षित आहेत. ठेवीदारांच्या ठेव सुरक्षितेच्या दृष्टीने ही निश्चितच अभिमानास्पद बाब आहे. गतवर्षाच्या तुलनेत गुंतवणुकीमध्ये **२१.३२%** इतकी वाढ झाली आहे.

## नफा विभागणी :

संस्थेला अहवालसाली **₹ ४५,०२,४४१.३७** इतका निव्वळ नफा झाला असून त्यामध्ये मागील वर्षाचा शिल्लक नफा **₹ १,८०७.४०** मिळवून दि. ३१ मार्च २०२३ अखेर एकूण **₹ ४५,०४,२४८.७७** इतकी रक्कम नफा विभागणीसाठी उपलब्ध आहे. या नफा विभागणीस संचालक मंडळ खालीलप्रमाणे शिफारस करीत आहे. त्यास मंजूरी देण्यात यावी.

### • नफा विभागणी •

| अ.क्र. | तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | राखीव निधी (२५%) | ११,२६,०६२.०० |
| २. | लाभांश १२% (दिनांक ३१ मार्च २०२३ पर्यंत प्रोरेटा बेसीस) | २४,५०,७३८.०० |
| ३. | बुडित व संशयित निधी | ७,५०,०००.०० |
| ४. | सेवक रजा रोखीकरण निधी | १,००,०००.०० |
| ५. | लाभांश समिकरण निधी | ५०,०००.०० |
| ६. | सभासद कल्याण निधी | ५,०००.०० |
| ७. | प्रशिक्षण निधी | २२,०००.०० |
| ८. | शिल्लक नफा | ४४८.७७ |
| | **एकूण नफा** | **४५,०४,२४८.७७** |

## संचालक मंडळाचे कामकाज :

संस्थेच्या दर्जेदार वाढीसाठी व नियोजनबद्ध विकासासाठी संचालक मंडळ कार्यरत आहे. संस्थेच्या संचालक मंडळाच्या अहवाल सालामध्ये एकूण **१०** सभा झाल्या असून संचालक मंडळ सदस्य मासिक सभेस बहुसंख्येने हजर राहिलेले आहेत. संचालक मंडळाच्या मासिक सभांमध्ये संस्थेच्या प्रत्येक कामकाजाविषयी सर्वांच्या विचार विनिमयाने ठराव मंजूर झालेले आहेत.

## सेवक वर्ग :

संस्थेमध्ये एकूण **३१** कर्मचारी व **१६** दैनंदिन ठेव प्रतिनिधी काम करत असून आम्हांस नमूद करण्यास आनंद वाटतो की, संस्थेच्या कामकाजामध्ये सेवक वर्गाकडून संपूर्ण सहकार्य लाभले आहे. त्यामुळे संस्थेचे वाढते कामकाज व सभासदांना समाधानकारक व तत्पर सेवा देणे शक्य होत आहे. २१ व्या शतकातील तांत्रिक बदल आत्मसात करून तसेच सहकार क्षेत्रापुढे सध्या असलेल्या अडचणींवर मात करुन संस्था प्रगतीपथावर नेण्यासाठी सिंहाचा वाटा उचलणाऱ्या सेवक वर्गाचा व दैनंदिन ठेव प्रतिनिधींचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

### आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी. व एस.एम.एस. सुविधा :

संस्थेने कोअर बँकींग प्रणाली अंगिकारली असून संस्थेच्या खातेदारांना रक्कम हस्तांतरित करण्यासाठी व व्यवहार सुलभ व जलद गतीने होण्यासाठी **आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी. व एस.एम.एस** सुविधा सुरु असुन खातेदार सभासदांना **(QR)** कोड वसुली ॲपद्वारे दैंनदिन ठेव वसुली व इतर डिजीटल सुविधा देण्यासाठी आम्ही प्रयत्नशिल आहोत.

### अंतर्गत लेखापरिक्षण :

अहवालसाली संस्थेचे अंतर्गत लेखापरिक्षण **मे. गणेश हाडवळे ॲन्ड असोसिएट्स** चार्टर्ड अकौंटन्ट, नवी मुंबई, यांनी केले असून, त्यांनी कामकाजाच्या दृष्टीने केलेल्या सूचना व शेरे यानुसार पुर्तता करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे, दोषविरहीत कामकाजाबाबत मोलाचे मार्गदर्शन केले त्याबद्दल संस्था त्यांची ऋणी आहे.

### वैधानिक लेखापरिक्षण :

संस्थेचे सन २०२२-२०२३ या वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण **मे. निलेश शिंदे ॲण्ड असोसिएटस्** (सनदी लेखापरिक्षक) यांनी पुर्ण केले आहे. संस्थेस **सन २०२२-२०२३** या वर्षासाठी लेखापरिक्षण वर्ग **'अ'** मिळाला आहे.

### आभार :

संचालक मंडळाच्या वतीने विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती , मा. सहकार आयुक्त व निबंधक सह. संस्था महाराष्ट्र राज्य पुणे, मा. जिल्हा उपनिबंधक सह.,संस्था कोकण भवन, नवी मुंबई, मा. उपनिबंधक सह.संस्था पुणे, संस्थेचे निवडणुक निर्णय अधिकारी,टी-विभाग मुलुंड (प.), सहकार खात्याचे अधिकारी व कर्मचारी वर्ग, यांनी संस्थेच्या प्रगतीसाठी केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल व सहकार्याबद्दल आभारी आहोत. तसेच संस्थेचे माजी संचालक, जी.एस.महानगर बँक, मुंबै बँक, सारस्वत बँक, कॉसमॉस बँक, अहमदनगर जिल्हा मध्य. सह. बँक, युनिटी स्मॉल फायनान्स बँक, ठाणे जनता सह.बँक लि.,आय.सी.आय.सी. आय.बँक, महाराष्ट्र राज्य सह. संघ, मुंबई सह.बोर्ड, महाराष्ट्र राज्य बि.कृषी सह.पतसंस्था फेडरेशन, संस्थेचे कायदेविषयक सल्लागार, मुल्यांकनकार, वैधानिक लेखापरिक्षक, अंतर्गत लेखापरिक्षक, पिओसिट सॉफ्टवेअर, आमुंडकर प्रिन्टर्स, सन्मान प्रिंटर्स, साईसिस इन्फोटेक, श्री नारायण मंदीर समिती नेरुळ, श्री हरेश्वर ग्रामीण विकास ट्रस्ट, श्री हरेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, कर्जुले हरेश्वर या विविध संस्थांचे पदाधिकारी व त्यांचे सेवक वर्ग यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करण्यात येत आहे.

## * गुणगौरव *



**संस्थेच्या सभासदांना विनंती करण्यांत येते की, ज्या सभासदांचे पाल्य सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षामध्ये इयत्ता १ ली ते ८ वी श्रेणी अ-१, अ-२,ब-१, ९ वी ते १२ वी-७५% आणि पदवी, पदविका,पदव्युत्तर परिक्षेत ६०% व त्यापेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेले आहेत.अशा पाल्यांची गुणपत्रिकेची साक्षांकित झेरॉक्स प्रत सभेपूर्वी ७ दिवस अगोदर संस्थेच्या जवळच्या शाखा कार्यालयात आणून द्यावी.**

# अध्यक्षीय मनोगत

**सन्माननीय सभासद बंधु भगिनींनो,**

**सप्रेम नमस्कार,**

आपल्या संस्थेचा दिनांक ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक आपणासमोर सादर करताना मला विशेष आनंद होत आहे. अहवालसाली संस्थेने आर्थिक प्रगतीमध्ये उत्तम कामगिरी करुन उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. आपण एकमेकांच्या विचारांची नेहमीच देवाण-घेवाण करत आलो आहोत. संस्थेच्या प्रगतीसाठी आपणाकडून वैविध्यपूर्ण मार्गदर्शनाची व सहकार्याची अपेक्षा.

अहवाल साला मधील अंदाजपत्रकातील बहुतेक सर्वच उद्दीष्टांची पूर्ती करण्यात आम्हाला यश आले आहे. वसूल भाग भांडवल, ठेवी, कर्जे, गुंतवणूक व उत्पन्न या सर्वच पातळीवर आपण समाधान कारक प्रगती केली असून संस्था स्थापनेपासून अहवाल साली सर्वाधिक वार्षिक वाढ झाली आहे. संस्थेच्या खेळते भाग भांडवलामध्ये रु. ९.४१ कोटी रुपयांची वाढ झाली असून संस्थेने एकूण संमिश्र व्यवसायाचा रु. ८२ कोटी रक्कमेचा टप्पा पूर्ण केला आहे. याचा निश्चितच आपणा सर्वांना अभिमान आहे. अहवाल साली संस्थेचे कर्ज थकबाकी चे प्रमाण ४.४०% इतके असून कर्जदार बांधवांना विनंती आहे की, आपल्या कर्जाचे हफ्ते नियमित भरणा करुन कर्ज खाते नियमित ठेवून संस्थेत सहकार्य करावे.

संस्थेने कोअर बँकिंग प्रणालीचा अवलंब केल्याने त्याचा फार मोठा फायदा संस्थेच्या सर्व शाखांमधील खातेदार सभासदांना होत आहे याचा पदोपदी प्रत्यय येत आहे. सातत्याने स्पर्धात्मक परिस्थितीला सामोरे जाऊन नवनवीन होणारे बदल आत्मासात केल्याने संस्थेचे व्यवहार हे अतिशय अचूक व गतिमान होत असल्याने आपणास दिसते. संस्थेने **(QR)** कोड घेतला असून सर्व शाखांमार्फत खातेदारांनी त्याचा वापर करुन आपले आर्थिक व्यवहार सुलभ व गतिमान करावे. कारण आजच्या डिजिटल युगात या व्यवहारांना खूप महत्त्व आहे. भविष्यात प्रत्येक व्यवसायिक खातेदारांचा **(QR)** कोड बनविण्याचा संस्थेचा मानस आहे. त्या अंतर्गत अन्य सेवा मोबाईल बँकिंग, आरटीसीएस/एन. ई.एफ.टी. सेवा देखील सशुल्क लवकरच संस्था सुरु करण्याच्या विचाराधीन आहे त्यामुळे सभासदांना शाखेत न येता आपल्या खात्याचे व्यवहार ऑनलाईन करता येऊन सभासदांची वेळेची व खर्चाची फार मोठी बचत होणार आहे.

कोविड १९ च्या प्रार्दुभावामुळे गेल्या दोन-तीन वर्षापासूनच्या राज्यातील बऱ्याचशा सहकारी संस्थाच्या निवडणुका काही कालावधी करता स्थगित होत्या. आपल्या संस्थेचा देखील मागील संचालक मंडळाचा कार्यकाल मार्च २०२१ मध्ये संपला होता त्यानंतर जुलै २०२२ मध्ये पुन्हा निवडणुक प्रक्रिया सुरु होऊन मार्च २०२३ मध्ये सन २०२२-२०२३ ते २०२७-२०२८ या पंचवार्षिक कालावधी करीता संचालक मंडळाची निवडणुक बिनविरोध पार पडली,

निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून शासनाच्या वतीने मा.श्री. हरीश जगताप साहेब यांनी कामकाज पाहिले, त्यांनी केलेल्या योग्य मार्गदर्शन व सहकार्याबद्दल संचालक मंडळाच्या वतीने त्यांचे मनापासून आभार व्यक्त करतो. तसेच संस्थेच्या हिताचा विचार करुन आपले उमेदवारी अर्ज मागे घेऊन संस्थेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी मोलाचे योगदान देवून सहकार्य केले. यामुळे संस्थेची वेळ व पैश्याची बचत झाली आहे, त्याबद्दल सर्व उमेद्वारांचे संचालक मंडळाच्या वतीने मी ऋण व्यक्त करतो.

आपल्या देशात सुमारे ८,५४,३५५ विविध प्रकाराच्या सहकारी संस्था नोंदणीकृत आहेत. संस्थांची सभासद संख्या २९ कोटी इतकी आहे. देशात पतसंस्थांची संख्या ही १,७७,६०५ इतकी आहे. महाराष्ट्र राज्यातील पतसंस्थामध्ये सभासदांची संख्या २ कोटी ३० लाख आहे. महाराष्ट्रामध्ये २० हजारांपेक्षा जास्त नागरी/ ग्रामीण बिगर शेती पतसंस्था व ६ हजार ५०० च्या वर पगारदार कर्मचारी पतसंस्था नोंदणीकृत आहेत.

राज्यातील पतसंस्थांमध्ये ७२ हजार ६८५ कोटी रुपयांच्या ठेवी सभासदांनी ठेवलेल्या आहेत आणि या पतसंस्थांमध्ये १ कोटी पर्यंत ठेवी असणाऱ्यांची संख्या ही ८ हजारांच्या वर आहे. म्हणजेच राज्यात ६२ टक्के पतसंस्था या १ कोटी रुपयापर्यंत ठेवी असणाऱ्या पतसंस्था आहेत. आणि उर्वरित ३८ टक्के पतसंस्था या १ कोटी पेक्षा जास्त ठेवी असणाऱ्या पतसंस्था आहेत. ही आकडेवारी लक्षात घेता पतसंस्थामधील ठेवीदारांना यापूर्वी कसलेही संरक्षण नसताना पतसंस्थांच्या विश्वासाहर्तमुळे ७२ हजार ६८५ कोटी रुपयांच्या ठेवी २ कोटी ३० लाख सभासदांनी पतसंस्थेमध्ये ठेवलेल्या आहेत. पतसंस्थांमध्ये गुंतवणुक करणाऱ्या ठेवीदारांना ठेवीसाठी संरक्षण देणेबाबत सहकार खाते विचाराधीन आहे. यासाठी पतसंस्थांना दरवर्षी नफ्यामधून अंशदान निधीची तरतुद करणे आनिवार्य केले आहे. या निधीचा वापर भविष्यात ठेवीदारांच्या ठेवींना विमा संरक्षण देणे हा शासनाचा एकमेव हेतू आहे.

संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आम्ही वचनबध्द राहू तुमच्या सर्वांच्या सहकार्याने संस्थेचा सहकार रथ सक्षमपणे पुढे घेऊन जाण्यासाठी आपणा सर्वांचे सहकार्य लाभले व यापुढेही अशीच सहकार्याची अपेक्षा करुन संस्थेच्या सर्व सभासद, ठेवीदार, हिंतचिंतक, कर्मचारी वर्ग व दैनंदिन ठेव प्रतिनिधी या सर्वांचे पुन:श्च आभार मानतो.

जय हिंद!   जय महाराष्ट्र!!   जय सहकार!!!

आपला स्नेहांकित,

**श्री. शंकर पांडुरंग शिंदे**

अध्यक्ष

## दिनांक ३१ मार्च २०२३ अखेरचे

| मागील वर्षी सन २०२१-२०२२ ₹ पै. | भांडवल व देणी CAPITAL & LIABILITIES | ₹ पै. | चालू वर्षी सन २०२२-२०२३ ₹ पै. |
|---|---|---|---|
| ५,००,००,०००.०० | **अधिकृत भाग भांडवल**<br>Authorised Share Capital<br>(५,००,०००/- भाग प्रत्येकी रु. १००/-प्रमाणे)<br>(5,00,000 Shares Accounting to Rs. 100 Per Share) | | ५,००,००,०००.०० |
| १,९९,४८,८००.०० | **वसुल भाग भांडवल**<br>Subscribed & Paid up Share Capital | २,१७,९९,०००.०० | २,१७,९९,०००.०० |
| | **राखीव व इतर निधी**<br>Reserve & Other Funds | | |
| १,०४,०२,११०.५० | राखीव निधी / Reserve Fund | १,१५,१२,२७५.५० | |
| १,४८,१५,६९७.०० | इमारत निधी / Building Fund | १,४८,२८,२४७.०० | |
| ५७,००,०००.०० | बुडीत व संशयित कर्ज निधी/Bad & Doubtful Debts | ९२,५०,०००.०० | |
| १२,००,०००.०० | बुडीत कर्ज व्याज निधी/ Bad & Doubtful Loan Int. fund | १,२०,०००.०० | |
| ७,००,०००.०० | उत्पादीत कर्ज निधी / Standerd Asset. Fund | ८,५०,०००.०० | |
| ३०,०००.०० | लाभांश समिकरण निधी/Div. Equ. Fund | २,३०,०००.०० | |
| १०,००,०००.०० | तंत्रविकास निधी/ Technology Develop. Fund | १०,०००.०० | |
| ५,००,०००.०० | सभासद कल्याण निधी/ Member Welfare Fund | ४,९५,०००.०० | |
| ३,०५,६२५.०० | आकस्मिक/अंशदान निधी/Contingency Fund | ३,९५,६२५.०० | |
| ३०,०००.०० | धर्मदाय निधी / Charity Fund | ३०,०००.०० | |
| १,४७,३५६.०० | प्रशिक्षण निधी / Training Fund | १,०९,९९४.०० | |
| १६,५२,४१०.०० | सेवक उपदान निधी / Staff Gratuity fund | १७,७१,६९६.०० | |
| ५,२०,०००.०० | सेवक कल्याण निधी /Staff Welfare Fund | ५,२०,०००.०० | |
| ८,०८,५५१.०० | निवडणूक निधी /Election Fund | ६,९८,५५१.०० | |
| ५,९२,३१६.७६ | रौप्य महोत्सव निधी / Silver Jubilee Fund | ५,९२,३१६.७६ | |
| १७,५२,६७४.०० | गुंतवणूक चढउतार निधी /Invt Fluctuation Fund | १९,६५,०५९.०० | ४,३३,७८,७६४.२६ |
| ६,०१,०५,५४०.२६ | पुढील पानावर / C/F | | ६,५१,७७,७६४.२६ |

## ताळेबंद पत्रक

| मागील वर्षी सन २०२१-२०२२ ₹ पै. | मालमत्ता व येणी ASSETS & PROPERTIES | ₹ पै. | चालू वर्षी सन २०२२-२०२३ ₹ पै. |
|---|---|---|---|
| | **रोख व बँकेतील शिल्लक** Cash & Bank Balance | | |
| ३९,१२,९८५.०० | हातावरील रोख शिल्लक / Cash in Hand | २०,२२,८६९.०० | |
| ८,१६,४१५.८४ | बँकेतील शिल्लक / Bank Balance | १६,७९,४१८.७९ | ३७,०२,२८७.७९ |
| | **गुंतवणूक** / Investment | | |
| | **दि. मुंबई जिल्हा मध्य. सह. बँक लि. The Mumbai D.C.Co.Op.Bank Ltd.** | | |
| १,०८,९७,६९२.०० | राखीव निधी /Reserve Fund | १,१९,९७,६९२.०० | |
| १६,५२,४१०.०० | सेवक उपदान निधी /Staff Gratuity Fund | १७,७१,६९६.०० | १,३७,६९,३८८.०० |
| | **मुदत ठेव** / Fixed Deposit | | |
| २,००,०००.०० | दि. मुंबई जिल्हा मध्य. सह. बँक लि. The Mumbai D.C. Co. op. Bank Ltd. | १,५२,००,०००.०० | |
| ७,८७,०१,४४७.०० | जी एस महानगर को-ऑप. बँक लि. G S Mahanagar Co. op. Bank. Ltd. | ७,०७,४८,४९३.०० | |
| १,१०,४०,१८६.०० | दि. कॉसमॉस को-ऑप. बँक लि. The Cosmos Co. op. Bank Ltd. | १,५०,९७,६५८.०० | |
| ८,८५,९७२.०० | दि. सारस्वत को-ऑप. बँक लि. The Saraswat Co. op. Bank Ltd. | ३९,४०,०६९.०० | |
| ३६,६२,८४६.०० | पंजाब ॲन्ड महाराष्ट्र को-ऑप. बँक लि. Punjab & Maharashtra Co. op. Bank Ltd. | ३२,७३,८५०.०० | |
| ०.०० | आय. सी. आय.सी. आय. बँक लि. ICICI Bank Ltd. | ५०,००,०००.०० | |
| १,२५,००,०००.०० | दि अहमदनगर जिल्हा मध्य. सह. बँक लि. The Ahmednagar Dis. Co.-op. Bank Ltd. | १,००,००,०००.०० | |
| ०.०० | दि ठाणे जनता सह. बँक लि. The Thane Janta Co.-op. Bank Ltd. | ८०,००,०००.०० | **१३,१२,६०,०७०.००** |
| १२,४२,६९,९५३.८४ | **पुढील पानावर / C/F** | | १४,८७,३१,७४५.७९ |

## दिनांक ३१ मार्च २०२३ अखेरचे

| मागील वर्षी सन २०२१-२०२२ ₹ पै. | भांडवल व देणी CAPITAL & LIABILITIES | ₹ पै. | चालू वर्षी सन २०२२-२०२३ ₹ पै. |
|---|---|---|---|
| ६,०१,०५,५४०.२६ | **मागील पानावरून / BF** | | ६,५१,७७,७६४.२६ |
| | **ठेवी / Deposit** | | |
| ७,३१,०३,२६६.०० | दामदुप्पट ठेव / Double Deposit | ९,६१,०५,७८०.०० | |
| ९,८४,७०,३५६.०० | मुदत ठेव / Fixed Deposit | ११,१५,०६,९५५.०० | |
| ६,५७,८४१.०० | मासिक आवर्त ठेव / Recurring Deposit | ११,२०,५२४.०० | |
| ७८,६७,८६७.०० | दैनंदिन ठेव / Daily Deposit | ८०,६५,८५८.०० | |
| १,४५,५३,४०१.१८ | बचत ठेव / Saving Deposit | २,०१,४९,७९१.७८ | |
| ५,१३,५४,५९२.०० | मासिक उत्पन्न ठेव / Monthly Income Sch. Dep. | ५,२८,३५,१७८.०० | |
| ६,९१,०८,४७६.०० | हरेश्वर समृध्दी ठेव / Hareshwar Samrudhi Deposit | ८,०२,९७,२२१.०० | |
| ५,३७,६५,२०५.०० | शिवसमृध्दी ठेव / Shiv Samrudhi Deposit | ५,८४,७८,१२८.०० | |
| ४३,५०,१६३.०० | लखपती/लक्षाधिश ठेव / Lakhpati Deposit | ७२,२६,५१७.०० | |
| १,४०,०००.०० | कर्मचारी ठेव / Staff Security Deposit | ३,०२,२२५.०० | ४३,६०,८८,१७७.७८ |
| | **ठेवीवरील व्याज देणे / Interest Accrued But Not Paid** | | |
| ६३,०४,९७३.०० | मुदत ठेव व्याज/ Int. Accrued Fixed Deposit | ७८,०२,९२२.०० | |
| ५१,८३३.०० | मासिक आवर्त ठेव व्याज/Int. Accrued Rec. Deposit | ६२,६५१.०० | |
| १,४६,२७५.०० | दैनंदिन ठेव व्याज / Int. Accrued Daily Deposit | १,४५,९६३.०० | |
| ५६,६३,९१०.०० | हरेश्वर समृध्दी ठेव व्याज / Int. Accrued Hareshwar Samrudhi Deposit | ७०,३६,५७७.०० | |
| ३०,४८,२६६.०० | शिवसमृध्दी ठेव व्याज / Int. Accrued Shiv Samrudhi Deposit | २७,३२,४३९.०० | |
| २,९०,३०२.०० | लखपती/लक्षाधिश ठेव व्याज Int. Accrued Lakhpati Deposit | ५,३८,८९९.०० | |
| २७,००४.०० | कर्मचारी सुरक्षा ठेव / Staff Security Deposit | १३,०९८.०० | १,८३,३२,५४९.०० |
| ४७,४०,३६४.८४ | **बँक अधिकर्ष कर्ज / Bank Over Draft Loan** | | |
| ---- | जी एस महानगर को-ऑप. बँक लि. G S Mahanagar Co. op. Bank. Ltd. | २,४६,६३,८८४.४२ | |
| २,२८,५५०.६५ | दि. कॉसमॉस को-ऑप. बँक लि. The Cosmos Co. op. Bank Ltd. | २,११७,०३८.२१ | |
| | दि. सारस्वत को-ऑप. बँक लि. The Saraswat Co. op. Bank Ltd. | ----- | २,६७,८०,९२२.६३ |
| ४५,३९,७८,१८५.९३ | **पुढील पानावर / C/F** | | ५४,६३,७९,४१३.६७ |

## ताळेबंद पत्रक

| मागील वर्षी सन २०२१-२०२२ ₹ पै. | मालमत्ता व येणी ASSETS & PROPERTIES | ₹ पै. | चालू वर्षी सन २०२२-२०२३ ₹ पै. |
|---|---|---|---|
| १२,४२,६९,९५३.८४ | **मागील पानावरून / BF** | | १४,८७,३१,७४५.७९ |
| | **भाग / Shares** | | |
| १,000.00 | दि. मुंबई जिल्हा मध्य. सह. बँक लि.<br>The Mumbai D. C. Co. op. Bank Ltd. | १,000.00 | |
| ६,000.00 | महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सह. पत. फेडरेशन लि.<br>Maha State Non Agri. Sah. Pat. Fed. Ltd. | ६,000.00 | |
| ५00.00 | मुंबई शहर नागरी सह. पत. फेडरेशन लि.<br>Mumbai S.N.S. Pat. Fedration Ltd. | ५00.00 | |
| १00.00 | बृहन्मुंबई नागरी सह. पतसंस्था फेडरेशन लि.<br>B. Mumbai Nagari Sah. Pat. Fedration Ltd. | १00.00 | |
| १00.00 | मुंबई जिल्हा सहकारी बोर्ड लि.<br>Mumbai District Sahakari Board Ltd. | १00.00 | |
| १000.00 | प्रणव कमर्शिअल प्लाझा सोसायटी<br>Pranav Commercial Plaza Society | १000.00 | ८,७00.00 |
| **१२,४२,७८,६५३.८४** | **पुढील पानावर / C/F** | | **१४,८७,४०,४४५.७९** |

दिनांक ३१ मार्च २०२३ अखेरचे

| मागील वर्षी सन २०२१-२०२२ ₹ पै. | भांडवल व देणी CAPITAL & LIABILITIES | ₹ पै. | चालू वर्षी सन २०२२-२०२३ ₹ पै. |
|---|---|---|---|
| ४५,३९,७८,९८५.९३ | **मागील पानावरून / BF** | | ५४,६३,७९,४१३.६७ |
| | **इतर देणी / Other Liabilities** | | |
| १५,६४,५१५.00 | लाभांश / Dividend | १४,७२,0३0.00 | |
| ४,५0,000.00 | कर्मचारी बोनस / Employees Bonus | ५,५0,000.00 | |
| २,५0,000.00 | शासकीय व अंतर्गत हिशोब तपासणी फी Govt. & Internal Audit Fee | ३,३0,000.00 | |
| ३0,000.00 | जी.एस.टी ऑडिट व रिटर्न फी GST Audit & Ret.Fee | ३0,000.00 | |
| ४0,000.00 | टॅक्स ऑडिट फी / Tax Audit Fee | ४0,000.00 | |
| १७,९८0.00 | विद्युत बिल / Electricity Bill | १६,९00.00 | |
| ४,७८२.00 | टेलिफोन बिल / Telephone Bill | ६,३१९.00 | |
| ५८,१३४.00 | कर्म.भ.नि.निधी / Staff P.F. | ५,१९,६४६.00 | |
| ५,00,000.00 | कर्मचारी वेतन फरक व रजा रोखीकरण / Staff Arrears & Leave Incashement | ५,६४,७२६.00 | |
| ५८,६९0.५५ | सी.जी.एस.टी. / CGST | ६0,६८0.५१ | |
| ५८,६९0.५५ | एस.जी.एस.टी. / SGST | ६0,६८0.५१ | |
| ३,२३४.00 | दैनंदिन ठेव टीडीएस / TDS Daily Dep. | ४,२५५.00 | |
| ४५,७0,१४,२१२.0३ | **पुढील पानावर / C/F** | | ५४,६३,७९,४१३.६७ |

## ताळेबंद पत्रक

| मागील वर्षी सन २०२१-२०२२ ₹ पै. | मालमत्ता व येणी ASSETS & PROPERTIES | ₹ पै. | चालू वर्षी सन २०२२-२०२३ ₹ पै. |
|---|---|---|---|
| १२,४२,७८,६५३.८४ | **मागील पानावरून / BF** | | १४,८७,४०,४४५.७९ |
| | **कर्ज / Loan And Advances** | | |
| ७३,१६,८३३.00 | वैयक्तीक कर्ज/Personal Loan | ८०,३९,८२८.00 | |
| १,८८,५२,६९१.00 | वाहन/मशिनरी तारण कर्ज/Vehicle/Machinery Loan | ३,२१,३९,३०४.00 | |
| १९,६५,६१,०५९.२० | व्यवसाय/मालमत्ता तारण कर्ज/ Business/ Property Mortgage Loan | २५,२९,२४,१६९.00 | |
| ४,१८,८४,७९४.00 | घर कर्ज/ Housing Loan | ३,५८,३४,४९५.00 | |
| १,९०,७३,२४४.२७ | सभासद रोखपत कर्ज/ Cash Credit Loan | ६,०७,९०८.00 | |
| ६,४०,०१६.00 | कर्मचारी वैयक्तीक कर्ज/Staff Personal Loan | ५१,३८,६५६.00 | |
| ४२,९२,७०३.00 | कर्मचारी घर कर्ज/ Staff Housing Loan | ३२,१०,५४०.00 | |
| ३४,१७,४३८.00 | कर्मचारी रोखपत कर्ज/ Staff Cash Credit Loan | १,८८,६२,७२७.४७ | |
| २,३५,०२,४२७.१२ | ठेव तारण कर्ज/ Deposit Loan | २,६७,८८,०७६.00 | ३८,३५,४५,७०३.६७ |
| | **स्थावर मालमत्ता / Fixed Assets** | | |
| २२,३१,२११.00 | फर्निचर आणि फिक्चर्स / Furniture & Fixtures | २०,०८,०९६.00 | |
| १६९,३९४.00 | संगणक / Computer Hardware | १,२८,१२७.00 | |
| ५२,६८९.00 | संगणक प्रणाली / Computer Software | २,७२,९८३.00 | |
| १४,३५,३४१.00 | डेड स्टॉक/ Dead Stock | १३,५३,१६३.00 | ३७,६२,३६९.00 |
| | **कार्यालय/ Office Premises** | | |
| ९,५१,४७६.00 | मुलुंड | ९,०३,९०२.00 | |
| १६,००,४१८.00 | कर्नाकबंदर | १५,२०,३९७.00 | |
| १२,१८,६११.00 | कामोठे | ११,५७,६८८.00 | |
| ३४,६९,५४१.00 | तुर्भे | ३२,९६,०६४.00 | |
| १३,३०,०७३.00 | टाकळी ढोकेश्वर | १२,६३,५६९.00 | |
| १९,८४,९६६.00 | कळंबोली | १८,८५,७१८.00 | १,००,२७,३३८.00 |
| ४५,४२,६३,५९५.४३ | **पुढील पानावर / C/F** | | ५४,६०,७५,८५६.४६ |

दिनांक ३१ मार्च २०२३ अखेरचे

| मागील वर्षी सन २०२१-२०२२ ₹ पै. | भांडवल व देणी CAPITAL & LIABILITIES | ₹ पै. | चालू वर्षी सन २०२२-२०२३ ₹ पै. |
|---|---|---|---|
| ४५,७०,१४,२१२.०३ | मागील पानावरून / BF | | ५४,६३,७९,४१३.६७ |
| ४,७२५.०० | कर्मचारी व्यवसाय कर देय / Staff .Professional Tax | ५,१२५.०० | |
| ३३,७०८.०० | संगणक प्रणाली खर्च / Computer Software Exp. | ३३,७०८.०० | |
| ३,६५२.०० | सन्ड्री क्रेडीटर्स / Sundry Creditiors | २,१६,३३५.०० | |
| ४,८११.०० | सरचार्जेस / Surcharge | ४,८११.०० | |
| ३,१३८.०० | कार्यालय भाडे देखभाल खर्च देणे/ | १३,५८६.०० | |
| २,६३३.०० | इंटरनेट बिल देणे / | ३,१११.०० | ३९,३१,९१३.०२ |
| ७७,२७,१२६.०० | कर्जावरील येणे व्याज / Interest Receivable on Loan (Contra) | ८४,८४,३६३.०० | |
| २,६०,३५१.०० | | --- | ८४,८४,३६३.०० |
| | **नफा-तोटा खाते** / Profit And Loss A/c | | |
| **३३३.२८** | **मागील वर्षाचा शिल्लक नफा / Last Year Profit Balance b/f** | **१,८०७.४०** | |
| **४१,१०,५९०.१२** | **चालू वर्षाचा नफा / Profit During Current Year** | **४५,०२,४४१.३७** | **४५,०४,२४८.७७** |
| ४६,९१,६५,२७९.४३ | **एकूण बेरीज / Total** | | ५६,३२,९९,९३८.४६ |

मे. निलेश शिंदे अॅन्ड असोसिएटस्
(सीए निलेश शिंदे)
सनदी लेखापरिक्षक

श्री. बबन शंकर शिर्के
खजिनदार

श्री. बाबाजी सबाजी आंधळे
सचिव

## ताळेबंद पत्रक

| मागील वर्षी सन २०२१-२०२२ ₹ पै. | मालमत्ता व येणी ASSETS & PROPERTIES | ₹ पै. | चालू वर्षी सन २०२२-२०२३ ₹ पै. |
|---|---|---|---|
| ४५,४२,६३,५९५.४३ | मागील पानावरून / BF | | ५४,६०,७५,८५६.४६ |
| | इतर येणी / Other Assets | | |
| १,६०,०००.०० | कार्यालय अनामत / Office Deposit | १,७०,०००.०० | |
| ७,०००.०० | बेस्ट सुरक्षा अनामत/ Security Deposit BEST | ७,०००.०० | |
| ५,५००.०० | टेलिफोन अनामत / Telephone Deposit | ५,५००.०० | |
| २५,०००.०० | कर्मचारी उत्सव अग्रीम / Employees Festival Adv. | २०,०००.०० | |
| १,०३,२६८.०० | शिल्लक स्टेशनरी / Stock of Stationery | ८२,८२५.०० | |
| ३९,०३,७०७.०० | बँक ठेवीवरील येणे / Int.Rece.on Bank Deposit | ४३,९३,६०६.०० | |
